**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यात नवी दिल्लीत चर्चा
- सेबीचे नवे अध्यक्ष म्हणून केंद्रीय वित्त सचिव तुहीन कांत पांडे यांची नेमणूक
- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन, मेक्सिको, कॅनडावर लादले अतिरीक्त कर, भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण

  **आणि**

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना

**<><><><><>**

भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात वर्ष अखेरपर्यंत मुक्त व्यापार कराराला अंतिम स्वरुप दिलं जाईल, अशी आशा युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयन यांनी व्यक्त केली आहे. नवी दिल्लीत एका कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्याशी चर्चा केली. यावेळी भारत-युरोपियन संघ यांच्यात धोरणात्मक भागीदारीला नवीन चालना देण्याबाबत त्यांच्यात चर्चा झाली. युरोपियन युनियन भारतासोबतचा आपला व्यापार विस्तारायला उत्सुक असून प्रस्तावित मुक्त व्यापार करार दोन्हींमध्ये

आर्थिक सहभागात लक्षणीय वाढ करेल असं मत लेयन यांनी यावेळी व्यक्त केलं.

<><><><><>

केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज युरोपीय व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयोगाचे आयुक्त मारोस सेफकोविच यांच्याशी आज चर्चा केली. भारत आणि युरोपिय संघ यांच्यात मुक्त व्यापार करार तसंच व्यापार आणि तंत्रज्ञान परिषदेच्या प्रगतीविषयी यावेळी चर्चा झाल्याचं गोयल यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. आगामी काळात युरोपियन संघ आणि भारत एकमेकांसोबत व्यापार आणि गुंतवणूकीत सहकार्य वाढवण्यासाठी काम करेल अशी आशा गोयल यांनी व्यक्त केली.

<><><><><>

न्यायाधारित विकसित भारत घडवण्यासाठी न्यायवैद्यक शास्त्राची महत्त्वाची भूमिका असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. गुजरातमध्ये गांधीनगर इथे राष्ट्रीय न्यायवैद्यक विद्यापीठाच्या तिसऱ्या दीक्षांत समारंभाला त्या संबोधित करत होत्या. यावेळी त्यांनी सर्वांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून विकसित भारताच्या संकल्पनेला अधोरेखित केलं.

गुन्ह्यांच्या बदलत्या स्वरुपाच्या पार्श्वभूमीवर न्यायवैद्यक शास्त्राचं महत्त्वं वाढत असल्याचंही त्या म्हणाल्या. न्यायवैद्यकीय तज्ज्ञांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि न्यायप्रक्रियेत त्यांच्या निर्णायक सहभागासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल राष्ट्रपतींनी विद्यापीठाचं कौतुक केलं. तसंच, या क्षेत्रात महिला

पदवीधरांच्या संख्येत वाढ झाल्याबद्दलही त्यांनी आनंद व्यक्त केला. या समारंभात दीड हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना पदवी आणि पदविका प्रमाणपत्रं प्रदान करण्यात आली.

<><><><><>

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. जिज्ञासा ही विज्ञानाची जननी आहे. विज्ञान आणि ज्ञान एकत्रितपणे प्रत्येक समस्येचं निराकरण करण्यासाठी उपयोगी येत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर एका पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

मुंबईत TIFR, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्रात आज राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा होत आहे. यानिमित्त विविध प्रयोग, प्रदर्शनं, प्रयोगांची प्रात्यक्षिकं, खेळ, कोडी, प्रश्नमंजुषा, अशा विविध सत्रांचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><><>

पुण्यातल्या स्वारगेट बस स्थानक बलात्कार प्रकरणातला आरोपी दत्ता गाडेला  आज पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी अटक केली. शिरूर तालुक्यातल्या कनाट गावातल्या ग्रामस्थांनी पोलिसांना मदत केली. त्याला आज न्यायालयात हजर केलं जाईल. हा खटला जलदगती न्यायालयात चालवणार असल्याचं पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्र सरकारनं सेबीचे नवे अध्यक्ष म्हणून केंद्रीय वित्त सचिव तुहीन कांत पांडे यांची नेमणूक केली आहे. मंत्रीमंडळाच्या नियुक्तीविषयक समितीनं काल

याला मंजुरी दिली. त्यांचा कार्यकाळ ३ वर्षांचा असेल. विद्यमान अध्यक्ष माधवी पुरी बूच यांचा कार्यकाळ आज संपुष्टात येत आहे. त्या सेबीच्या पहिल्या महिला अध्यक्ष होत्या तसंच खासगी क्षेत्रातून नियुक्त केलेल्या पहिल्या व्यक्ती होत्या.

<><><><><>

राज्य सरकारनं फेसबुक आणि व्हॉट्सअपची प्रवर्तक असलेल्या मेटा या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. याद्वारे व्हॉट्स ॲप गव्हर्नन्स ही संकल्पना प्रत्यक्षात आणली जाणार आहे. यामुळं राज्य सरकारच्या विविध सेवा नागरिकांना व्हॉट्सअपवर मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबई टेक वीक या कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर ते मुंबईत वार्ताहारांशी बोलत होते.

केंद्र सरकारनं नवीन फौजदारी दंड संहिता लागू केली आहे. शक्ती कायद्यातल्या अनेक तरतुदी त्यात समाविष्ट आहेत. त्यामुळं शक्ती कायद्याचं स्वरुप बदलून नवीन आणावा लागणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

युद्ध किंवा कारवाईदरम्यान कर्तव्य बजावताना अपंगत्व आलेल्या सैनिकांना दिल्या जाणाऱ्या सानुग्रह आर्थिक मदतीत दुपट्ट वाढ पंजाब सरकारनं मंजूर केली आहे. राज्याच्या सैनिक कल्याण विभागाचे मंत्री मोहिंदर भगत यांनी ही माहिती दिली. नवीन तरतुदींनुसार, ७६ ते १०० टक्के अपंगत्व असलेल्या सैनिकांना ४० लाख रुपये मिळतील. तर ५१ ते ७५ टक्के अपंगत्व

असलेल्या २० लाख, २५ ते ५०टक्के अपंगत्व असलेल्या सैनिकांना १० लाख रुपये मिळतील.

**<><><><><>**

प्रख्यात ओडिया चित्रपट अभिनेते उत्तम  मोहंती यांचं गुरुग्राममधल्या एका खाजगी रुग्णालयात काल रात्री निधन झालं. यकृताच्या आजारामुळे ते आजारी होते. त्यांच्यावर भुवनेश्वरमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. उत्तम  मोहंती  यांनी १३० हून अधिक ओडिया चित्रपटांमध्ये काम केलं आहे.

त्यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल ॲड एंटरटेनमेंट संमेलन ‘व्हेवज् एक्सप्लोरर चॅलेंजच्या माध्यमातून कथाकार आणि रचनाकारांना युट्यूब शॉट्स तयार करून आपला भारताबाबतचा दृष्टिकोन जगासमोर मांडण्याची संधी देत आहे. या शॉट्सद्वारे ते भारताची विविधता, प्रामाणिकपणा आणि प्रतिभा टिपू शकतात. शॉट्सच्या आशयाचे सृजन रचनाकाराने स्वतः केलेले असणे आवश्यक आहे. व्ही लॉग साठी तयार केलेला व्हिडीओ जास्तीत जास्त ७ मिनिटांचा तर शॉट्स जास्तीतजास्त १ मिनिटाचा असावा.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आयोजित केलेल्या व्हेवज् या कार्यक्रमाचा हा प्रमुख उपक्रम असून तो १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून होणाऱ्या आयातीवर १० टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा केली आहे. तसंच काल रात्री, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी येत्या मंगळवार पासून कॅनडा आणि मेक्सिकोवर २५ टक्के कर लावणार असल्याचं स्पष्ट केलं. या महिन्यात चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर याआधीच १० टक्के कर लावण्यात आला आहे. अमेरिकेत फेंटानिल या औषधाचा प्रवाह रोखण्यासाठी पुरेशी कारवाई झालेली नसून चीनमध्ये तयार होणार हे औषध कॅनडा आणि मेक्सिकोमार्गे अमेरिकेत येतं असल्याचं ट्रम्प यांनी सांगितलं. मेक्सिको आणि कॅनडा यांनी सीमा सुरक्षा सुधारण्यासाठी आणि ड्रग्ज तस्करी रोखण्यासाठी आवश्यक पावले उचलली नाहीत तर त्यांच्यावर कर लावले जातील असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे.

यामुळे देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण सुरू आहे. सेन्सेक्स तेराशे हून अधिक अंकांनी घसरुन ७३ हजार २०० अंकांच्या आसपास व्यवहार करतो आहे. निफ्टी सुमारे ४०० अंकांची घट नोंदवून २२ हजार १०० अंकांच्या जवळ आहे.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुपारी ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होईल. लाहोरमध्ये दुपारी अडीच वाजता या सामन्याला सुरुवात होईल. हा सामना जिंकला किंवा पावसामुळे रद्द झाला तरी ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरीत पोहोचेल. अफगाणिस्तानला मात्र उपांत्य फेरीतल्या प्रवेशासाठी हा सामना जिंकणं आवश्यक आहे. भारत आणि न्यूझीलंड ब गटातून यापूर्वीच उपांत्य फेरीत पोहोचले आहेत.

पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातला कालचा सामना रावळपिंडीमध्ये सुरू असलेल्या पावसानं रद्द झाला. यामुळं पाकिस्तान स्पर्धेबाहेर गेला. चॅम्पियन्स करंडकाच्या २९ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच यजमान देश एकही सामना न जिंकता स्पर्धेबाहेर गेलाय.

**<><><><><>**

दुबई खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा ऑस्ट्रेलियन जोडीदार अलेक्झेई पोपीरीन पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. ऑस्ट्रेलियाचा जॉन पीअर्स आणि ब्रिटनचा जेमी मुरे यांच्यासोबत आज दुपारी त्यांचा सामना होईल.

**//<><><><><>//**